// सा विद्या या विमुक्तये //

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325

Website : srtmun.ac.in
e-mail : affi.srtmun@gmail.com

दि. १९.०६.२०१८ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रगटनामधील महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारणे बाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :– या विभागाने दि. १९.०६.२०१८ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात प्रसिध्द केलेले जाहीर प्रगटन.

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या कांही महाविद्यालयांनी त्यांचेकडे थकित असलेले संलग्नीकरण शुल्क विद्यापीठास सादर केले नसल्यामुळे मा. विद्या परिषदेच्या निर्णयाप्रमाणे त्यांचे सन २०१८–१९ या वर्षाचे प्रवेश स्थगित करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात या विभागाने दि. १९.०६.२०१८ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिर प्रगटन ही प्रसिध्द केले आहे.

जाहीर प्रगटनामधील यादीतील महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८–१९ करीता आपल्या महाविद्यालयात चालू असणा–या संबंधित अभ्यासक्रमाच्या केवळ प्रथम वर्षाचे प्रवेश स्थागित करण्यात आलेले आहेत. मात्र महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेशावर कोणतीही स्थागिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भिय परीपत्रकातील महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील संबंधित अभ्यासक्रमांच्या द्वितीय व तृतीय वर्षासाठीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांचे परीक्षा आवेदन पत्र शुल्कासहित स्विकारावेत. तसेच संबंधित अभ्यासक्रमाच्या सर्व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचेही परीक्षा आवेदनपत्र सशुल्क स्विकारावेत व संबंधित विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी, अन्यथा अशी कार्यवाही न करणा–या महाविद्यालयांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

P.T.O.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर **Affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड–४३१६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०१८–२०१९/1185 )(
दिनांक :– ३१.०८.२०१८. )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य, सर्व संबंधित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
३. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर **Affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.